Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

News Letter

वार्तापत्र

वर्ष : 2 रे • अंक : 2 रा
जाने. – मार्च 2023
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

# संपादकीय ...

**Not all of us can do great things. But we can do small things with great love - Mother Teresa**

दु:खी माणसाला मदत करण्यासाठी लांबवलेला एक हात प्रार्थने साठी जोडलेल्या दोन हातां पेक्षा अधिक उपयुक्त आहे.

– स्वामी विवेकानंद

सदोदित परिस्थिती बदलत असते आणि या बदलत्या परिस्थितीला सामोरे जाताना तरुण रक्त व युवा पिढी जेवढी पटकन सामावून घेवू शकते तेवढे वृद्धांना जमणे अवघड जाते. पण अशा तडजोडीशिवाय त्यांच्यासमोर दुसरा पर्यायही नसतो. रूळ बदलताना गाडीची जशी थोडीफार खडखड होते, तसेच या वृद्धांच्या अवस्थेत या नव्या प्रश्नांना व नव्या परिस्थितीला सामोरे जाताना त्यांना त्रास होतो; पण त्याचा विचार प्रौढ वयातच सुरू केला पाहिजे. मुलगी सासरी जाते. मुले शिक्षणासाठी परगावी व परदेशी जातात. सध्या साठीनंतरच्या वृद्धांना 'ज्येष्ठ नागरिक' म्हणतात.ज्येष्ठ नागरिकही अनेक शहरांतून स्वत:ची संघटना उभारून, स्वमनोरंजन, उद्बोधन व त्यांच्या जोडीला समाजोपयोगी कार्य करण्यात स्वत:ला गुंतवून घेत आहेत. ज्येष्ठ नागरिकांची वाढती संख्या व औषधपाण्याच्या सुविधांमुळे असलेली सर्व प्रकारची क्षमता लक्षात घेता, त्यांनी या आपल्या मोकळ्या वेळेचा असा सदुपयोग सुरू केला आहे. आपापल्या आवडीनुसार त्या त्या कार्यामध्ये स्वत:ला गुंतवून घेणे हे वृद्धांना सहज शक्य आहे. आयुष्यात ज्या गोष्टी करायच्या राहून गेल्या असे वाटत असेल, त्या त्या क्षेत्रांत, छंदात स्वत:ला रमविणे हा फार मोठा विरंगुळा त्यांच्यासमोर आहे. जगभरातील वृद्धांच्या वाढत्या समस्यांना हे चांगले उत्तर होऊ शकते.

एका सुभाषितात 'ज्या सभेत वृद्ध नाहीत, ती सभाच नाही' असे म्हटले आहे. हे वृद्धपण केवळ शरीराशी निगडित नाही, हे तर उघडच आहे. आयुष्यभराच्या अनुभवांनी त्यांना खूपसे शिकविलेले असते. समजूतदारपणा , व्यापक व सखोल दृष्टी, जीवनाचे नेमके भान त्यांना आलेले असते. त्याचा लाभ समाजाला करून देण्याने त्यांचे स्वत:चे जीवन ही सार्थकी लागत असते. वृद्धपणा ही समस्या आहे की, स्वत:कडे, स्वत:च्या छंदाकडे, समृद्धीकडे लक्ष देत आनंद घेण्याचा काळ आहे, हे ज्याचे त्यानेच ठरवायचे असते. 'ठेविले अनंते तैसेचि राहावे। चित्ती असू द्यावे समाधान ।।' ही वृत्ती वृद्धपणाला सगळ्यात जास्त लागू पडणारी आहे.

कोविड ची महामारी संपूर्णपणे संपली आहे अशा समजुतीने सर्व देशांनी त्यांच्या त्यांच्या देशातील सर्व बंधने काढून टाकलेली असतानाच चीन मध्ये कोविडच्या नवीन व्हेरियंट च्या बातमीमुळे संपूर्ण जगात संभ्रमावस्था निर्माण झाली आहे . हा नवीन व्हेरियंट फार झपाट्याने पसरतो परंतु एखादा माणूस मृत पावेल एवढा शक्तिशाली नाही पण फक्त ज्या वृद्धांची रोगप्रतिकारक शक्ती क्षीण झाली आहे त्यांनाच फक्त धोका आहे अशा बातम्यांमुळे पुन्हा एकदा चिंतेचे वातावरण आहे. या बाबतीतील बातम्या खूप उलटसुलट आहेत सर्व लोकांनी याबाबत काळजी घ्यावी विशेषतः जेष्ठ नागरिकांनी तर विशेष काळजी घ्यावी.

सन 2023 या वर्षासाठी सर्वांना हार्दिक शुभेच्छा येणारे नवीन वर्ष सर्वांना सुखाचे आनंदाचे आणि भरभराटीचे जावो ही सदिच्छा!

# लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया

मी गंगाधर तरवटे.मी **67** वर्षे वयाचा असून मी पंचवटी ,नाशिक येथे राहतो. हेमंत चिंचोरे नाशिक जे माया केअरचे स्वयंसेवक आहेत त्यांच्याशी माझा फार जुना परिचय आहे. मी स्वतः पॅरालिसिस पेशंट असल्याने माझा एक हात  काम करत नाही. त्यामुळे हेमंत मला महिन्यातून **3/4** वेळेस मदतीसाठी हजर असतात. मला मदत दिल्याबद्दल माया केअर टीम चे आभारी आहे.

गंगाधर तरवटे मो. **9423966051**

***

मंगल दृष्टी वृद्धाश्रम सोलापूर येथे माया केअर च्या स्वयंसेविका अश्विनी जोशी नेहमी येतात. वृद्धाश्रमातल्या ज्येष्ठ नागरिकांकडून  वाचन, भजन, कीर्तन करून घेतात.तसेच त्यांच्या  सोबत गप्पा गोष्टी करतात. त्यांचे सुख दुःख वाटून घेतात. ज्या आजी बोलत नाहीत गुपचूप बसून असतात त्यांच्या चेहऱ्यावर निर्मळ हसू  आणतात. खरंच माया केअर खूप  छान काम करत आहे. त्याच्या प्रत्येक मेंबर चे आम्ही धन्यवाद करतो की  त्या आपल्या वेळेतुन वेळ काढून आमच्या वृद्धाश्रमात  येतात . माया केअर असाच नेहमी फुला सारखा हसत खेळत असुदे.

रजनी भाटिया मो. **9284032680**

***

मातोश्री वृद्धाश्रम औरंगाबाद मध्ये कित्येक वर्षे झाली आम्ही राहतो. या ठिकाणी आम्हाला प्रत्येक जण खाण्यासाठी घेऊन येतात आणि निघून जातात, परंतु माया केअर चे स्वयंसेवक येतात आमच्याशी हितगुज साधतात हे आम्हाला फार आवडते.  स्वयंसेवक येतात आमच्याशी गप्पा गोष्टी  करतात . आम्हाला खूप छान वाटते. माया केअर च्या माध्यमातून आम्हाला विरंगुळा निर्माण  झालेला आहे.

सखाराम गायकवाड, गायत्रीबाई चौगुले मो. **9850607818**

***

मी नारायण हुकरे माझे  वय **76** आहे. मी पंजाब कॉलनी पिपरी वर्धा इथे राहतो सौ. पूनम वाटकर हया माया केअरच्या स्वयंसेविका आहेत. त्यांचा आणि माझा  परिचय **5** वर्षां पासून आहे. त्या वेळो वेळी माझी मदत करतात मला हॉस्पिटल, बँक मध्ये घेऊन जातात . व माझ्या सोबत वेळ घालवतात. कारण माझ्या घरी मी आणि माझी पत्नी असते. त्यांची आम्हाला खूप मदत होते. धन्यवाद माया केअर तुम्ही खूप छान कार्य करत आहात .

श्री नारायण हुकरे मो. **7350743659**

***

नमस्कार,

मी महादेव घोटेकर रा. चिकमारा,  ता. नागभीड, जि. चंद्रपूर येथे सपत्नीक राहतो.माझे वय 79 वर्षे आहे.एक दिवस माझी अचानक प्रकृती  खूप बिघडली होती. त्यामुळे मला दवाखान्यात सुद्धा जाता येत नव्हते. त्यामुळे अचानक आमच्या गावातीलच मुलगा निखिल वंजारी फिरता फिरता माझ्या घराजवळून जात होता. मी घरीच दरवाज्याजवळ बसलो होतो. त्यांनी मला विचारले काय झाले बाबाजी असे का पडले आहेत. मी त्याला म्हटले, बेटा माझी तब्येत ठीक नाही. तेंव्हा त्यांनी मला दवाखान्या  बद्दल विचारणा केली. मला कोणी घेऊन जाणार नसल्यामुळे मी गेलो नाही. तेंव्हा त्यांनी लागलीच चंद्रपूर जिल्ह्याचे समन्वयक श्री रामदास कामडी यांना फोन केले तेंव्हा निखिल यांना मला दवाखान्यात घेऊन जाण्यासाठी सांगितले. लगेच निखिल यांनी मला नागभीड येथे दवाखान्यात घेऊन गेले व डॉक्टरांना दाखवले तेव्हा डॉक्टर म्हणाले लवकर घेऊन आले म्हणून बरे झाले नाहीतर काहीही होऊ शकले असते. तेंव्हा मला ग्लुकोज वगैरे चढवून माझी प्रकृती बरी झाली व सुट्टी देण्यात आली. श्री रामदास कामडी व माया केअर खरेच खूप आमच्या वृद्धांसाठी कौतुक स्तंभ काम करते. त्यांचे कितीही आभार मानले तरी कमीच आहे. मी हमेशा माया केअर चा ऋणी आहे  त्यांनी मला माझ्या नाजूक प्रकृती मधून वाचवले. त्याचबरोबर निखिल वंजारी हे सुद्धा माया केअर करीता खूप कौतुकास्पद  काम करतात.

श्री महादेव घोटेकर मो. **9370874158**

***

# माया केअर वृत्त

1. गिव्ह फाऊंडेशन द्वारे माया केअर संस्थेसाठी 'दान उत्सव' अंतर्गत 2 ऑक्टोबर 2022 ते 25 नोव्हेंबर 2022 पर्यंत **online** देणगीचे आवाहन करण्यात आले होते. धनिक आणि दानशूर लोकांनी या उत्सवात आपापल्या परीने देणगी दिली. 50 लाख रु देणगी चे उद्दिष्ट असताना एकूण 3,46,115 रु. देणगी जमा झाली असून गिव्ह फॉउंडेशन यात आपली भर टाकेल व ती देणगी संस्थेला देण्यात येईल. माया केअर संस्थेचा वटवृक्ष आता चांगलाच विस्तारला असून भारतातील 57 शहरांमध्ये व इंग्लंडमधील 5 शहरांमध्ये ज्येष्ठांना सुमारे 120 विकलांग उमेदवार आणि काही कृतिशील स्वयंसेवकाच्या माध्यमातून मोफत सेवा दिल्या जातात.

2. शांतिवन वृद्धाश्रम कर्वेनगर , पुणे येथील ज्येष्ठांच्या सेवेसाठी दि. 11 नोव्हेंबर 2022 रोजी स्वयंसेवकांनी एक बहुविध मनोरंजनाचा कार्यक्रम सादर केला. विनीता महाजन, बासरी वादक श्री रमेश फडके, श्री विद्याधर जोशी व श्री महेश कुलकर्णी या स्वयंसेवकांनी हा कार्यक्रम सादर करून त्यांची मने जिंकली.

3. काही कृतिशील स्वयंसेवकांनी आवास सेवा सदन लोणावळा या वृद्धाश्रमाला दि. 15 डिसेंबर 2022 रोजी भेट दिली. स्वयंसेवक श्री अनिल नातू आणि श्री महेश कुलकर्णी यांनी तेथील वृद्धांना संस्थेची माहिती दिली. तेथील एक ज्येष्ठ श्री साईनाथ रावराणे जे एक उत्तम चित्रकार आहेत, त्यांनी काही स्वयंसेवकांची हुबेहूब रेखाचित्रे रेखाटून वाहवा मिळवली.

4. 30 नोव्हेंबर 2022 रोजी गंगातारा वृद्धाश्रम वडकी नाला पुणे येथे माया केअर संस्थेने नटरंग अकादमी संस्थेतर्फे भरतनाट्यम कार्यक्रम आयोजित केला. समन्वयक माधुरी खराटे व संतोष तुळजापुरे यांनी मायाकेअर तर्फे कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले. प्रणव कादेकर दिग्दर्शित या कार्यक्रमात नेहा पासलकर, पावणी पवार, पूर्वा भागवत आणि जान्हवी शिंदे या रूपसुंदर नर्तिकांनी आपल्या पदलालित्याने 20 वृध्दाना आनंद दिला. स्वयंसेवक श्री लक्ष्मण अंभोरे आणि अंकुश शिर्के यांनी या कार्यक्रमाला बहुमुल्य सहाय्य केले.

5. दि.1 ऑक्टोबर 2022 रोजी माननीय पोलीस आयुक्तालय पुणे यांच्या भरोसा सेल( वृध्द लोकांची सुरक्षा सेवा) अंतर्गत ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करण्यात आला.यामध्ये स्वयंसेवकांनी आपले अनुभव सांगितले. माया केअर चे संस्थापक सदस्य डॉ सुरेश गोखले यांनी ही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

6. माहेर या आव्हाळवाडी, वाघोली पुणे येथील अनाथ आणि बेघर पुरुषांचे पुनर्वसन करणाऱ्या संस्थेत तसेच अमेय केअरटेकर सेंटर धनकवडी, पुणे येथे अनुक्रमे जयेश माळी आणि महेश कुलकर्णी या स्वयंसेवकांनी संस्थेच्या सेवांची माहिती दिली. तसेच कोथरूड मित्र पाक्षिक कार्यालयात भेट देऊन स्वयंसेविका विनिता महाजन यांनी सेवांची माहिती दिली.

7. दिनांक 17 नोव्हेंबर 2022 रोजी बिंदू समुहातील सदस्य श्री रामदास कामडी, संध्या अत्राम व माधुरी खराटे यांनी नागपूर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये दुसऱ्या प्रीतम सिंग मेमोरियल फाउंडेशन सादरीकरणांमध्ये माया केअर फाउंडेशन कशा प्रकारे कार्य करते याबद्दल सादरीकरण केले. या स्पर्धेमध्ये 500 च्या वर स्पर्धकांनी भाग घेतला होता. संध्या अत्राम यांनी परीक्षकांना रामदास कामडी व माधुरी खराटे यांची ओळख करून पुढील माहिती दिली.यामध्ये रामदास कामडी यांनी कोविड काळामध्ये लसीकरण प्रकल्प कशाप्रकारे यशस्वीतेने हाताळला याबद्दल माहिती दिली. व माधुरी खराटे यांनी माया केअर भारताच्या 57 शहरांमध्ये व इंग्लंड येथे 5 शहरांमध्ये कशाप्रकारे उत्तमरीत्या कार्य करते याबद्दल माहिती दिली.

त्यानंतर रामदास कामडी यांनी डिसेंबर 2021 रोजी झालेल्या ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशन स्पर्धेमध्ये बिंदू समुहातील अभिजीत माळी, अर्चना चंदणे व निलेश बोर्डे यांनी व्हीलचेअर वर बसून या स्पर्धेमध्ये भाग घेऊन ,कशाप्रकारे प्राविण्य मिळवले हे सांगण्यात आले. नॅशनल को–ऑर्डिनेटर ज्योती मोरे व प्रेरणा कुलकर्णी या गेल्या 13 वर्षापासून माया केअर मध्ये कशाप्रकारे यशस्वीरित्या काम करत आहेत व घरी बसून ज्येष्ठ नागरिकांना कशाप्रकारे मदत करत आहे याबद्दल माहिती देण्यात आली.

या सादरीकरणानंतर परीक्षकांनी माया केअर मधील बिंदू समूहात जे स्वतः अपंग असून इतरांसाठी मदतीचे कार्य करतात या कार्याचे कौतुक केले.

# निलेश दादाला भावपूर्ण श्रद्धांजली.

**माया केअर बिंदू टीमचा सदस्य निलेश बोर्डे याचे दिनांक 3 ऑक्टोबर 2022 रोजी दुःखद निधन झाले. त्याला श्रद्धांजली म्हणून हा लेख**



बहती हवा सा था वो उड़ती पतंग सा था वो कहा गया उसे देखो।

आमचा निलेश दादा आज आमच्यात नाही यावर विश्वासच बसत नाही. हे सुंदर फुल नियतीने अचानक तोडून नेले. आपल्या अपंगत्वावर मात करत जिद्दीने करिअर करणाऱ्या आम्हा सर्वांसाठी तो एक रोल मॉडेल होता. आम्हा सर्वांना धीर देणे असो, माया केअर चा संदेश गरजू ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहोचवणे असो किंवा संस्थेला देणगी मिळवून देण्यासाठी अथक प्रयत्न करणे असो, या सर्व आघाड्यांवर निलेश दादाचे काम अतिशय स्फूर्तिदायक होते. माया केअर मधील प्रत्येक सदस्याच्या वेळेची कदर करत त्यांच्याशी तो स्वतःहून संवाद साधायचा. प्रत्येक बिंदू टीम सभासदाशी त्याचे घनिष्ठ मैत्रीचे नाते होते. आज तो आपल्यात नाही या कल्पनेने आम्हा सर्वांचे डोळे आपोआपच पाणावतात.

मी ,माझे बिंदू समूहातील काही सहकारी आणि स्वयंसेवक महेश कुलकर्णी सर यांनी त्याच्या सांगितलेल्या काही आठवणी:

**1.** अर्चना चंदणे

निलेश सर हे प्रत्येक वेळेला खूप मदत करायचे. नाही हा शब्दच त्यांच्या जीवनात नव्हता. कितीही मोठं वादळ समोर असलं तरीही निलेश सर ते वादळ पेलण्याची तयारी ठेवायचे आणि मी नेहमी तुझ्यासोबत असेन असे बोलून मला धीर द्यायचे.

***

**2.**संध्या अत्राम

श्वासही अडकून गेला, तुम्ही नजरेआड होताना,
उर सारा भरून आला,
क्षितीजे अशी दुर जाताना क्षितीजे अशी दुर जाताना

ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते हा बोध घेऊन निलेश सर सतत प्रत्येकाला ज्ञान देण्याचे कार्य करायचे. माझी भाषाशैली असो, संगणकातील ज्ञान असो, प्रत्येक अडचणीच्या वेळी त्यांनी मला मोलाचे सहकार्य करून कितीही अवघड काम असेल तर ते काम सतत करण्याचा प्रयत्न करा व नेहमी प्रयत्नशील राहा असे बोध देऊन कामाचे शिस्त लावणारे निलेश सर होते.

***

**3.** शर्वरी वाल्हेकर

अनेक भाषांवर स्वतःचं प्रभुत्व ठेवून वेळेला महत्त्व देणारे असे होते माझे निलेश सर. स्वतःकडे असलेली माहिती व ज्ञान इतरांना पुरवून सर्वांना सोबत घेऊन चालणे व कामाशी प्रामाणिक असणे हा त्यांचा मुख्य गुणधर्म होता.कितीही कामात असले तरी सहकाऱ्यांचे असलेले प्रश्न त्यांनी मार्गी लावून त्यांना नेहमी सोबत घेऊन जाण्याची इच्छा व धडपड त्यांनी दाखवून दिलेली आहे.

***

**4.** माधुरी खराटे

गुलाबाचे फुल होता दादा तुम्ही, सुगंध दरवळत होता त्या क्षणी , प्रत्येकाच्या राहणार तुम्ही मनी.राहणार तुम्ही मनी.

निलेश हे सर नसून ते माझे भाऊ होते. कोणतेही काम हे काम असतं आणि ते करताना लाजायचं नसतं आणि कोणी अडचणीत असेल कोणाला जमत नसेल तर त्यांना त्या कामाची माहिती देऊन सोबत घेऊन जायचं असतं, ही लाख मोलाची शिकवण मला निलेश दादांनी दिली होती. काम करत असताना ज्यावेळेस मला अडचणी येतात त्यावेळी क्षणाक्षणाला त्यांची आठवण अजूनही मला येते. असा माणसातला देव माणूस आज आपल्यात नाही याचं मला व माझ्या सहकाऱ्यांना खूप दुःख होत आहे.

***

**5.** महेश कुलकर्णी : आकांक्षापुढती जिथे गगन ठेंगणे.

अत्यंत महत्वाकांक्षी , निष्ठावंत आणि आदर्श असा निलेश बोर्डे हा माया केअर चा सदस्य आज आपल्याला सोडून गेला आहे. एस व्ही पी फास्ट पीच इंडिया तर्फे घेण्यात आलेल्या समाजसेवी संस्थांच्या स्पर्धेत निलेश दादाने मायाकेअर चे प्रतिनिधित्व केले आणि संस्थेच्या कार्याची माहिती सर्वांना देऊन समाजभान जागृत केले. मायाकेअर म्हणजे अपंग आणि गरजू वृद्ध यांना प्रेमाने जोडणारा कसा दुवा आहे हे त्याने अतिशय उत्तम रित्या सादर केले. या स्पर्धेत माया केअर ला द्वितीय पारितोषिक मिळाले.

***

निलेश दादा, तुझ्या या आठवणी म्हणजे आम्हा सर्वांना एक पुरून उरणारा प्रचंड स्फुर्तीचा एक खळाळता झरा आहे.
तुझ्या आठवणी नेहमीच आमच्या ओठावर खालील ओळी जिवंत ठेवतील.
भुला के अपने गम को हम जीना सिखाते है सबको।
वह कहते है कर नही पाओगे हम करके दिखाते है सबको।
तुझ्या आत्म्याला शांती लाभो ही परमेश्वराला प्रार्थना.

# एक अनुभव

मी सौ. शुभांगी नानाजी चौगुले मु.पो.वाकडे जि. कोल्हापुर. शिक्षण – MSW पद– अधिक्षिका विभाग– महिला व बाल समुपदेशन केंद्र कोल्हापूर कार्य– पीडित, अत्याचारित महिला. अनाथ, निराधार वंचित घटकातील बालक यांचे समुपदेशन करणे.

माया केअर फाउंडेशन पुणे स्वयंसेवक कोल्हापुर जिल्हयात मी काम करत असताना माझी ओळख ज्येष्ठ नागरिक यांची सेवा करणारी मुलगी, महिला या अनुषंगाने होत आहे. काम कशा प्रकारे करायचे आहे आणि त्याचे महत्त्व, उद्देश्य ,सामाजिक परिवर्तन ज्येष्ठ नागरिक यांच्या समवेत त्यांना कशा प्रकारे सेवा प्रदान करायच्या हे या माध्यमातून समजले.

मातोश्री वृद्धाश्रम चंबुखडी कोल्हापुर, मातोश्री वृद्धाश्रम आर.के नगर कोल्हापुर, सावली केअर
सेंटर कोल्हापूर चे तीन विभाग तसेच माय सावली, सावली केअर, सुखावा,आधार, माऊली, शिवतेज या ठिकाणी जाऊन ज्येष्ठ नागरिकांशी संवाद करणे, पेपर अथवा ग्रंथ, पुस्तक, लेख, कादंबरी वाचून दाखवणे, गाणे भक्तीगीत, त्याच्या आवडीचे गाणे गाणे, त्याच्या कडून ऐकणे, नृत्य सादर करणे, कॅरम, बादलीत बॉल टाकणे, संगीत खुर्ची, बुद्धिबळ असे खेळ खेळुन त्यांची करमणूक करणे. या अशा प्रकारे सेवा प्रदान करण्याची संधी मला स्वयंसेवक म्हणून  या माया केअर फाउंडेशनच्यावतीने मिळत आहे.

कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक करिता कार्य करत असताना आज  माझी ओळख  समाजात  निर्माण
झाली आहे त्याच्या चेहऱ्यावर आनंद पाहुन मला तथा माझ्या कुंटुबाला अभिमान वाटत आहे. ज्येष्ठ नागरिकांचे अनुभव, माझ्याबद्दल त्याचे प्रेम, आदर, आपुलकी आणि त्याचे आशीर्वाद मला मिळत आहेत.

माया केअर फाउंडेशन पुणे या विभागाची मी मनापासुन आभारी आहे.

माया केअर फाउंडेशन पुणे स्वयंसेवक
सौ. शुभांगी तानाजी चौगुले (MSW)

***

**सायबर गुन्हे होऊन आपले हक्काचे आणि कष्टाचे पैसे उडविले जाऊ नयेत यासाठी घ्यावी लागणारी दक्षता:**

1) आपला पासवर्ड गुप्त ठेवावा. तो कुणालाही अगदी जवळच्या नातेवाईकांना सुद्धा सांगू नये.
2) पासवर्ड बनविताना त्यामध्ये किमान एखादे तरी अक्षर मोठ्या लिपीत(कॅपिटल लेटर्स) मध्ये असावे. तसेच एकस्पेशल कॅरेक्टर ( उदा. **@ # $** वैगेरे) असावे. तसेच एखादा अंक असावा.पासवर्ड  किमान आठ अक्षरांचा असावा. उदा. **Abc@#7527** या प्रकारात असावा.
3) फेसबुकवर अनोळखी लोकांची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारु नये. कारण बरीच बनावट खाती असतात.
4) अनोळखी तसेच संशयास्पद इ– मेलना  प्रतिसाद देऊ नका. तसेच व्हाट्सअप वर त्यांच्या लिंक्स ओपन करू नका.
5) आर्थिक लाभासाठी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नका.
6) कोणत्याही परिस्थितीत आपला ओ टी पी कोणालाही सांगू नका
7) फोनवर डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्डची माहिती देऊ नका.
8) या व अश्या अनेक सर्व खबरदाऱ्या घेऊन सुद्धा आपल्या खात्यातून पैसे गेल्यास त्वरित 1930  या नंबरवर फोन करावा. किंवा  http:cybercrime.gov.in या संकेतस्थळावर जाऊन तक्रार नोंदवा.
9) केवायसी ची माहिती प्रत्यक्ष बँकेत किंवा संस्थेत जाऊन द्या.
10) आपल्या आधारकार्डची व पॅन कार्डची प्रत देताना त्यावर आपण ज्या कारणासाठी देत आहोत त्याचा उल्लेख करावा.
11) अनोळखी एस एम एस वरील लिंक ओपन करू नये.



आमचे अहमदनगरचे स्वयंसेवक महेश लाड हे मालती गोरे यांना त्यांच्या वस्तू पोहोच करत असताना.



आमच्या वर्ध्याच्या स्वयंसेविका कोमल घुमे छबूबाई बडवाईक यांना मोबाईलवर कीर्तनाचा कार्यक्रम दाखवत असताना.



शंकर खोकले यांना ग्रामपंचायत सेवे कडून आरोग्य कार्ड योजना काढून देत असताना. आमचे चंद्रपूरचे स्वयंसेवक नितीन वंजारी.



नालंदा वस्ती स्टार वृद्धाश्रम नागपूर येथे साहित्य सामग्री देत असताना आमचे नागपूरचे स्वयंसेवक कुणाल मोटघरे.



कोल्हापूर इथे आमचे स्वयंसेवक अभिषेक यादव विश्वास पांचाळ यांना व्हॉटस ॲप विडिओ कॉल आणि इतर माहिती देत असताना.



नागेश पाटील यांना चित्र काढण्यास मदत करत असताना सोलापूरचे स्वयंसेवक किशोर लहासे



सोलापूरच्या स्वयंसेविका सीता बनसोडे धनम्मा बिद्रे यांना पुस्तक वाचून दाखवत असताना.



आमचे धुळ्याचे स्वयंसेवक राजेश बागुल हे मनोरमा भावसार त्यांच्याशी सोबत करताना.



दैवत वृद्धाश्रमात औरंगाबादच्या  स्वयंसेविका सुवर्णा धांडे
ज्येष्ठ नागरिकां सोबत गप्पा गोष्टी करत असताना.  .




आमचे पुण्याचे  स्वयंसेवक श्री विद्याधर जोशी बी. एन आय चॅम्स
या संस्थेने सर्व एन. जी ओ. यांची मीटींगमध्ये
सांगीतलेल्या माहीतीबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.



मातृसेवा सेवाभाव  संस्था पुणे इथे आमच्या
स्वयंसेविका सुवर्णा वाघमारे भेट देत असताना. .




गंगातारा  वृद्धाश्रम पुणे इथे प्रणव कराडे नृत्यविद्या कार्यक्रम
प्रस्तुत करत असताना आमचे स्वयंसेवक अंकुश शिर्के,
लक्ष्मण अंभोरे,सोमनाथ बरकडे .



आमच्या पुण्याच्या स्वयंसेविका डॉ. सुवर्णा आगटे यांनी ज्योती मांडे
यांच्या आत्मविश्वास वाढवला व पायऱ्या चढण्याचे प्रोत्साहन दिले .



पुण्यातल्या सुषमा जोगळेकर यांना मंगेशकर हॉस्पिटल
मध्ये नेत असताना  आमच्या स्वयंसेविका प्रियांका लिखिते



स्वागतम  वृद्धाश्रम सी.बी.डी. बेलापूर नवी मुंबई
येथे माया केअर च्या स्वयंसेवकांनी भेट दिली.



आय आय एम नागपूर येथे माया केअर कशाप्रकारे
कार्य करते याबद्दल बिंदू समूहातील रामदास कामडी,
संध्या अत्राम, व माधुरी खराटे यांनी सादरीकरण केले.

Maya CARE Foundation

The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना मोफत 90 मिनीटांच्या भेटी

✻ **सेवा** ✻

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी / गॅझेटस वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत

## MAYA CARE FOUNDATION (INDIA) HELPLINE NUMBERS

| CITY | HELPLINE NO. |
|---|---|
| Pune, Mumbai, Kolhapur, Nagpur, Nasik, Sangli, Solapur, Ahmednagar, Nandurbar, Aurangabad, Buldhana, Akola, Jalgaon, Amravati, Parbhani,Jalana, Dhule, Wardha, Yawatmal, Satara, Chandrapur. | 9552510400<br>9552510411<br>9623571845 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

Merchant Name : **MAYA CARE FOUNDATION**
Mobile Number : **7721053535**

✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

**NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED** (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
**ACCOUNT NO. : 187501000462**
**IFSC CODE : ICIC0001875**

**PRINTED MATTER**

बुक-पोस्ट

FROM,

**माया केअर फाऊंडेशन**
1214 शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,
सुभाषनगर, गल्ली नं.04, पुणे - 411002.

केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

TO,

श्री/श्रीमती ______________________

______________________

______________________

______________________

______________________